कब्जेहक्क प्रकरण - III व भाडेपट्टा - सोनारपाडा (समर्थ समाज डोंबिवली)

समर्थ ... आवक क्र. २०७/९५-२५ दिनांक ९/६/१९९५ सही

क्र. महसूल/कक्ष-१/टे २/एल.बी.पी./२३०,
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.
ठाणे. दि. १/०५/१९९४.

वाचा :- १] अध्यक्ष, समर्थसमाज, डोंबिवली यांचा दिनांक २६.०५.१९८४ व दि. १७.०२.१९९२ चे अर्ज.

२] आयुक्त, कल्याण महानगरपालिका, कल्याण यांचेकडील पत्र क्रमांक. कमापा-नरवि/९२६, दिनांक ०३.०६.१९९३ व पत्र क्र. कमपा/नरवि/११२९, दिनांक १५.०६.१९९३.

३] शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील ज्ञापन क्रमांक. जमीन-२७९२/प्र.क्र. २११९/ज-४, दिनांक २६.०४.१९९४

४] तहसिलदार कल्याण यांचेकडील पत्र क्रमांक. जमीनबाब/२/पशी-१२७, दिनांक ११.०५.१९९४ अन्वये प्राप्त झालेला सन. १९८९ ते १९९३ या पांच वर्षांचा खरेदी विक्री व्यवहाराचा तक्ता.

५] शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. एलआरएफ-१०९२/प्र.क्र. ८७/ज-१, दिनांक ३०.०६.१९९२.

आदेश :-

शासन, महसूल व वन विभागाकडील उपरोक्त नमूद केलेल्या ज्ञापन दिनांक २६.०४.१९९४ अन्वये मौजे. सागांव-सोनारपाडा, तालुका. कल्याण, येथील स.नं. १४९ [नवीन स.नं.५] मधील एकूण क्षेत्र ६१,७०० चौ.मि. [६.१७ हेक्टर] जमिनीपैकी रहिवास विभागामध्ये अंतर्भूत असलेली १२,००० चौ.मी. कब्जेहक्काने व उर्वरित हरित पट्ट्यात येणारी ४९,७०० चौ.मी. जमीन वार्षिक भुईभाडे आकारुन भाडेपट्ट्याने स.है. जोंधळे समर्थसमाज संस्था, डोंबिवली या संस्थेस देण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. हरितपट्ट्यातील जमिनीचे मुल्यांकन सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडून करुन घेतले नंतर जमिन भाडेपट्ट्याने मंजूरी बाबतचे आदेश निर्गमीत करणेत येतील.

शासन निर्णय क्रमांक. एलआरएफ-१०९२/प्र.क्र. ८७/ज-१, दि. ३०.०६.१९९२ मधील आदेशानुसार आणि महाराष्ट्र जमिन महसूल [सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे] नियम, १९७१ मधील नियम ५ मधील तरतुदीनुसार मी, जिल्हाधिकारी, ठाणे मौजे. सागांव-सोनारपाडा, तालुका. कल्याण येथील स.नं. १४९ [नविन स.नं. ५] मधील एकूण क्षेत्र ६१,७०० चौ.मी. (६.१७ हेक्टर) जमिनीपैकी रहिवास विभागामध्ये अंतर्भूत असलेली व सोबतच्या नकाशांत दाखविलेली क्षेत्र १२,००० चौ.मी. [ बारा हजार चौरस मिटर ] जमीन स.है. जोंधळे समर्थसमाज संस्था, डोंबिवली या संस्थेस, संस्थेच्या तंत्र निकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारतीच्या

......२..